**सं.फौ. ख. क्र.५३८/२०२३.**
**सरकार वि. उत्तम**
**निशाणी क्रमांक – २२.**

**सरकार तर्फे साक्षीदार क्रं. ०३ यांची जबानी**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करितो की,

**माझे नाव** - अशोक प्रभाकर बावसकर,
**वय** – ६४ वर्षे, **व्यवसाय** - इलेक्ट्रीक,
**राहणार** - बोरगाव नागपूर.

**सरतपास सरकार तर्फे अधिवक्ता श्रीमती. रणवरे यांच्यातर्फे**

**०१.** घटना दि.१७.०५.२०२३ रोजी घडली. त्यादिवशी मी इलेक्ट्रीकच्या कामासाठी रोहित पाठक, यांचे देवलापार येथील शेतात जात होतो. त्यांच्या शेतात काम केल्यानंतर रोहित व मी नाश्ता करण्यासाठी देवलापार जुने पोलिस स्टेशन समोर रेस्टॉरेंटमध्ये नास्ता करण्यासाठी दुपारी १ वाजता गेलो. १५-२० मिनीट नंतर नास्ता झाल्यावर १.२० मिनीटानी आम्ही परत त्यांच्या शेतात जाण्यासाठी निघालो. तेवढयातच समोरुन रॉग साईडने बुलेरो गाडी क्र.एम.एच४०-९८४१ आली व त्याने आमच्या गाडीला उजव्या बाजुन हेड लाईटला धडक दिली. आमच्या गाडीचे अंदाजे ६०,०००/- रुपयाचे नुकसान झाले. त्या गाडीवाल्याला थांबुन आम्ही नाव विचारले असता त्याने त्याचे नाव उत्तम भलावी असे सांगितले.

**०२.** त्यानंतर रोहितने पोलिस स्टेशनला कंम्पलेंट केली. त्यानंतर पोलिस घटना स्थळी आले व पाहणी केली. पोलिसांनी माझ्याकडे विचारपुस केली परंतु बयाण घेतले नाही. आरोपी आज न्यायालयात हजर आहे. मी त्यास ओळखतो.

**सरतपास पुर्ण.**

**उलट तपासणी आरोपीकरिता ॲड श्री एम.ए. गुप्ता यांचेमार्फत**

**०३.** मी रोहितच्या वडीलांकडे आधीपासून इलेक्ट्रीकचे काम करतो म्हणून मी त्याला आधीपासून ओळखतो. माझे बोरगाव येथे राहणे आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटना दि.१७.०५.२०२३ रोजी घडली. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी मी इलेक्ट्रीकच्या कामासाठी रोहित पाठक, यांचे देवलापार येथील शेतात जात होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यांच्या शेतात काम केल्यानंतर रोहित व मी नाश्ता करण्यासाठी देवलापार जुने पोलिस स्टेशन समोर रेस्टॉरेंटमध्ये नास्ता करण्यासाठी दुपारी १ वाजता गेलो.

**०४.** हे म्हणणे खरे नाही की, १५-२० मिनीट नंतर नास्ता झाल्यावर १.२० मिनीटानी आम्ही परत त्यांच्या शेतात जाण्यासाठी निघालो, हे मी खोटी सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तेवढयातच समोरुन रॉग साईडने बुलेरो गाडी क्र.एम.एच४०-९८४१

आली व त्याने आमच्या गाडीला उजव्या बाजुन हेड लाईटला धडक दिली, हे मी खोटी सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या गाडीचे अंदाजे ६०,०००/- रुपयाचे नुकसान झाले, हे मी खोटी सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या गाडीवाल्याला थांबुन आम्ही नाव विचारले असता त्याने त्याचे नाव उत्तम भलावी असे सांगितले, हे मी खोटी सांगत आहे.

**०५.** मी रोहितच्या गाडीचे क्रमांक सांगु शकत नाही. रोहितची गाडी स्कॉरपीओ होती. हे म्हणणे खरे नाही की, मी कधीही रोहित सोबत देवलापारला गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, रोहितने पोलिस स्टेशनला कंम्पलेंट केली, त्यानंतर पोलिस घटना स्थळी आले व पाहणी केली, पोलिसांनी माझ्याकडे विचारपुस केली, हे मी खोटी सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, रोहितच्या वडीलांकडे मी काम करतो म्हणून त्यांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
सही/-
(श्रीमती. डी. सी.वोराणी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं.२, रामटेक

रामटेक
दिनांक -३०/०४/२०२६.